# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

**Date – 06 November 2024**

**Time 7.10 AM to 7.20 AM**

**Language Marathi**

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०६ नोव्हेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

- विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात सर्वत्र प्रचाराला सुरुवात
- शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांची दहा वचनांची घोषणा, तर वंचित बहुजन आघाडीचा `जोशाबा समतापत्र` जाहीरनामा प्रकाशित
- राज्याच्या पोलीस महासंचालकपदी संजय वर्मा यांची नियुक्ती
- संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला २५ नोव्हेंबर पासून सुरूवात
- राज्यात विधानसभा निवडणुकीची तयारी अंतिम टप्प्यात, एकूण एक लाख १८६ मतदान केंद्रांची उभारणी

आणि

- केंद्रीय निवडणूक आयोगाचे वरिष्ठ अधिकारी आज छत्रपती संभाजीनगर इथं निवडणूक प्रक्रियेचा आढावा घेणार

****

राज्य विधानसभा निवडणुकीत उमेदवारांचं चित्र स्पष्ट झाल्यानं आता प्रचार सुरु झाला आहे. विविध राजकीय नेत्यांच्या प्रचारसभांना कालपासून सुरुवात झाली. प्रचाराला केवळ १४ दिवसांचा कालावधी असल्यानं प्रभावी प्रचारावर उमेदवारांचा भर दिसून येत आहे.

शिवसेनेचे मुख्य नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजप नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत काल कोल्हापूर इथं महायुतीच्या प्रचाराचा शुभारंभ झाला. यावेळी शिंदे यांनी दहा वचनांची घोषणा केली. यामध्ये लाडक्या बहिणींना २१०० रुपये, शेतकऱ्यांना कर्जमाफी, वीज बिलात ३० टक्के कपात आणि १०० दिवसांत व्हिजन

महाराष्ट्र २०२९ सादर करणार, आदी वचनांचा समावेश आहे. भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष रामदास आठवले, यावेळी उपस्थित होते.
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी काल कोल्हापूर इथून प्रचाराला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी रत्नागिरी इथं देखील सभा घेतली.

****

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी बारामतीत शिर्सुफळ गावात पक्षाचे उमेदवार युगेंद्र पवार यांच्या समर्थनार्थ प्रचार सभा घेतली. राज्यसभेचा आपला दीड वर्षांचा कार्यकाळ बाकी असून, यानंतर पुन्हा राज्यसभेवर जायचं की नाही, याचा विचार करावा लागेल, असं सांगून त्यांनी, सक्रीय राजकारणातून निवृत्तीचे संकेत दिले आहेत. राजकारण फक्त निवडणूक आणि सत्तेसाठी नाही, तर लोकांच्या जीवनात बदल घडवण्यासाठी करायचं असतं, असं सांगून या भागात विविध क्षेत्रांमध्ये केलेल्या कामाचा लेखाजोखा त्यांनी मांडला.

****

औरंगाबाद पश्चिम मतदारसंघातले महाविकास आघाडीचे उमेदवार राजू शिंदे यांनी सातारा इथल्या खंडोबारायाचं दर्शन घेऊन प्रचाराचा प्रारंभ केला, तर शहरात एमआयएम पक्षाचे आमदार अकबरूद्दीन ओवेसी यांनी जाहिर सभा घेऊन पक्ष प्रचाराला सुरूवात केली. औरंगाबाद मध्यचे महायुतीचे उमेदवार प्रदीप जैस्वाल यांनी मित्र पक्षासह पद यात्रेद्वारे नागरिकांशी संवाद साधला.

****

वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी काल पुण्यामध्ये, जोतिबा, शाहू, बाबासाहेब यांच्या विचारांनी प्रेरित, 'जोशाबा समतापत्र' हा पक्षाचा जाहीरनामा प्रकाशित केला. जोशाबा समतापत्र हे आरक्षण बचाव यात्रा, बौद्ध समाज संवाद दौरा आणि आदिवासी सत्ता संपादन परिषदेत मिळालेल्या जनहितोपदेशातून आणि सूचनांवरून तयार करण्यात आलं आहे.

****

विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसचा जाहीरनामा आज प्रसिद्ध होणार आहे. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांच्या हस्ते मुंबईत वांद्रे कुर्ला संकुलात त्याचं प्रकाशन होईल. त्यानंतर महाविकास आघाडीच्या महाराष्ट्र स्वाभिमान सभेलाही ते संबोधित करतील. या

सभेला ज्येष्ठ नेते शरद पवार, उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात यांच्यासह महाविकास आघाडीतले प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. तत्पूर्वी राहुल गांधी आज दुपारी नागपुरात 'संविधान सन्मान संमेलनाला' उपस्थित राहणार आहेत.

****

निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी राज्यात येत्या आठ ते १४ नोव्हेंबर दरम्यान ११ सभा घेणार आहेत. आठ नोव्हेंबरला धुळे आणि नाशिक, नऊ तारखेला अकोला आणि नांदेड, १२ तारखेला चंद्रपूर, चिमूर, सोलापूर आणि पुणे आणि १४ नोव्हेंबरला छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई आणि मुंबईत पंतप्रधानांच्या सभा होणार आहेत.

****

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची आज लातूर जिल्ह्यात रेणापूर इथं लातूर ग्रामीण विधानसभेतले मनसेचे उमेदवार संतोष नागरगोजे यांच्या प्रचारार्थ जाहीर सभा होणार आहे.

****

महायुतीतमध्ये जे – जे मतदारसंघ सोडण्याचं निर्धारित झालं होतं, त्याठिकाणी एकत्रित काम कसं करता येईल यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरु असल्याचं, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी म्हटलं आहे. ते काल मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. बंडखोर उमेदवारांची एक–दोन दिवसात समजूत घालून त्या – त्या मतदारसंघातलं वातावरण योग्य पद्धतीने पूरक होईल असा प्रयत्न असल्याचं ते म्हणाले. २८८ जागांवर महायुती पूर्ण ताकदीने एकत्रित निवडणूक लढत असल्याचं तटकरे यांनी स्पष्ट केलं.

****

राज्याच्या पोलीस महासंचालक पदावर काल संजय वर्मा यांची नियुक्ती झाली. ते १९९० च्या तुकडीचे भारतीय पोलीस सेवेचे अधिकारी आहेत. सध्या ते कायदा आणि तंत्रज्ञान विषयक पोलीस महासंचालक म्हणून कार्यरत आहेत. एप्रिल २०२८ मध्ये ते निवृत्त होणार आहेत.

****

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला २५ नोव्हेंबर पासून सुरूवात होणार आहे. हे अधिवेशन २० डिसेंबरपर्यंत चालेल. या काळात २६ नोव्हेंबरला संविधान

स्वीकृतीचा पंच्याहत्तरावा वर्धापन दिन संविधान सभेच्या मध्यवर्ती कार्यालयात साजरा केला जाईल अशी माहिती, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सामाजिक माध्यमांवर दिली.

****

राज्यात विधानसभा निवडणुकीची तयारी आता अंतिम टप्प्यात आहे. राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस चोक्कलिंगम यांनी काल मुंबईत निवडणुकीच्या तयारीविषयी माहिती दिली. याबाबतचा हा वृत्तांत:

*''राज्यात मतदारांच्या संख्येच्या प्रमाणात मतदान केंद्राच्या संख्येत वाढ केली असून, एकूण एक लाख १८६ मतदान केंद्र असल्याचं चोक्कलिंगम यांनी सांगितलं. यामध्ये शहरी मतदान केंद्र ४२ हजार ६०४, तर ग्रामीण मतदान केंद्र ५७ हजार ५८२ इतकी आहेत. शहरी भागातल्या मतदारांची अनास्था विचारात घेऊन शहरी भागातल्या मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करावं, यासाठी राज्यामध्ये पुणे, मुंबई, ठाणे, आदी शहरांमध्ये अतिउंच इमारती, सहकारी गृहनिर्माण संस्थांची संकुलं यामध्ये एकूण एक हजार १८१ मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत. राज्यात विधानसभा निवडणुकीसाठीची आचारसंहिता लागू झाल्यापासून आतापर्यंत एकंदर ४६ हजार ६३० जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई केल्याची माहितीही चोक्कलिंगम यांनी दिली. या कालावधीत राज्यात २५२ कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याचंही त्यांनी सांगितलं. २८८ पैकी १८५ मतदारसंघांमध्ये एक, १०० मतदारसंघांमध्ये दोन, तर ३ मतदारसंघांमध्ये तीन बॅलेट युनिट्स लावण्यात येणार असल्याचंही त्यांनी नमूद केलं. मतदानाच्या सुरुवातीला आणि मतदान संपल्यानंतर मतदान यंत्रांमध्ये किती चार्ज आहे, याची नोंद ठेवण्याच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या मागणीवर केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निर्णय घेऊ, असंही चोक्कलिंगम यांनी सांगितलं. येत्या २० तारखेला मतदान करण्याचं आवाहन देखील त्यांनी केलं.''*

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन

प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज यवतमाळ जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

केंद्रीय निवडणूक आयोगाचे पाच वरिष्ठ अधिकारी आज छत्रपती संभाजीनगर इथं जिल्ह्याच्या निवडणूक प्रक्रियेचा आढावा घेणार आहेत. छत्रपती संभाजीनगरसह नागपूर, अमरावती विभागाचाही आढावा यावेळी घेतला जाईल. उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके यांनी ही माहिती दिली.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आतापर्यंत विविध कारवायांमध्ये एक कोटी ८५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आचारसंहिता कक्षाचे नोडल अधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी त्यांनी मतदानासाठी लागणाऱ्या सोयी सुविधा तसंच नियोजनाचा आढावा घेतला. जिल्ह्यात १८३ उमेदवारांसाठी एकूण ७ हजार ४३० मतदान यंत्रांची आवश्यकता असल्याचं मीना यांनी सांगितलं.

****

मतदान जनजागृती करण्यासाठी परभणी जिल्हाधिकारी कार्यालय आणि उपविभागीय कार्यालयाच्यावतीनं, निवडणूक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या वाहनांवर, मी मतदान करणार, असे स्टिकर्स लावण्यात आले आहेत. तसंच कलापथकांच्या वाहनांवर आवाजाचे भोंगे लावून मतदान करण्याचं आवाहन करण्यात येत आहे.

****

धाराशिव-तुळजापूर रेल्वेमार्गाचं सात किलोमीटरचं पायाभूत काम पूर्ण झालं आहे. कामाचा वेग असाच कायम राहिल्यास, आपण ठरवलेल्या उद्दिष्टानुसार पुढील २४ महिन्यांच्या आत कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्रापर्यंत रेल्वेमार्गाचं काम नक्की पूर्ण होईल, असा विश्वास, आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

****

जालना जिल्ह्यात २०२३-२४ या वर्षाच्या खरीप हंगामाची पैसेवारी जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्ह्यातल्या ९७१ गावांपैकी ४६२ गावांमध्ये ५० पैशापेक्षा कमी, ५०९ गावांमध्ये ५० पैशांपेक्षा जास्त पैसेवारी जाहीर करण्यात आली आहे.

परतूर तालुक्यातलं राणीवाहेगाव हे गाव पूर्णत: निम्न दुधना प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रामध्ये गेल्यामुळे त्या गावाची पैसेवारी जाहीर करण्यात आलेली नाही, असे जिल्हा प्रशासनानं कळवलं आहे.

****